# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### उस्मानाबाद जिल्ह्यातील १३ हजार १५५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याबाबत

**(१) ५१८२ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील १३ हजार १५५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील २०९ महाविद्यालयामधून १६ हजार ९९१ विद्यार्थ्यांनी ई-शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करुन काही महिन्यांचा कालावधी होऊनही सदरील विद्यार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांना त्यांची प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) व (२) उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण २२५ महाविद्यालय असून सन २०१४-१५ मध्ये अनुसूचित जाती, विजाभज, विमाप्र व इमाव प्रवर्गातील एकूण २१६२० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केले असून त्यापैकी २०२३९ अर्ज निकाली काढले आहेत व १३८१ अर्ज प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित असलेले अर्ज सन २०१५-१६ मधील उपलब्ध तरतूदीतून प्राधान्याने निकाली काढण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली येथील समाजकल्याण विभागासाठी जिल्हा परिषद शेषनिधी अंतर्गत मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजना वगळण्यात आल्याबाबत**

**(२) ५६३३ (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील जि.प. समाजकल्याण विभागासाठी जिल्हापरिषद शेषनिधी अंतर्गत मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या विविध योजना वगळण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जि.प.समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीयांसाठी विविध योजना राबविल्या जाता त्यासाठी जिल्हा परिषद शेषनिधी अंतर्गत निधी राखून ठेवला जातो मात्र सर्वसाधारण सभेला काही योजनांचा निधी कमी जास्त करण्याचा अधिकार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही योजना राबवायच्या किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार हा सर्वसाधारण सभेकडून वापरला जातो तसेच सर्वसाधारण योजनेबाबत अधिकारी असले तरी कडबा, कटर व सौरकंदिलाचा आवश्यकता असतांना या दोन योजना बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) जिल्ह्यातील लाभार्थ्यांची गरज लक्षात घेवुन कमी योजना घेवून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळावा यासाठी कडबा कटर, टिन पत्रे, विद्युत पंप, एच.डी.पी.ई. पाईप या योजना जिल्हा परिषदेने हाती घेतल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी ई-स्कॉलरशिप योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आल्याबाबत**

**(३) ७९२३ (०९-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शिष्यवृत्ती मिळावी म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून ई-स्कॉलरशिप योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने आतापर्यंत किती मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन

अर्ज प्राप्त झाले आहेत तसेच शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून राज्यातील सुमारे २ लाखांहून अधिक विद्यार्थी मागील ३ वर्षापासून वंचित राहिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून ई-स्कॉलरशीप योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले आहे त्यांनाही शिष्यवृत्तीची रक्कम अदा न झाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिष्यवृत्तीचा लाभ विनाविलंब सर्व देय विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने तसेच ऑनलाईन अर्ज करण्यास दिरंगाई करणा-या महाविद्यालय प्रशासनावर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच विद्यार्थी योजनेंपासून वंचित राहू नये यासाठी कोणती अधिक सक्षम उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सन २०११-१२ पासून २०१४-१५ पर्यंत एकूण ६५०८११० मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. सन २०१३-१४ पूर्वीचे १७५४०४ अर्ज व सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील ३१५४७७ असे एकूण ४९०८८१ इतके अर्ज प्रलंबित आहेत. महाविद्यालयाकडून छाननी करुन सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाकडे विहीत वेळेत ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड केले नसल्यामुळे तसेच पुरेसा निधी अभावी काही अर्ज प्रलंबीत आहेत. सदरचे प्रलंबीत अर्ज सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात प्राधान्याने मंजूर करण्यात येत आहेत.

(४) व (५) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर इतर आवश्यक कागदपत्रे उदा. जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांकडून प्राप्त होत नसल्यामुळे महाविद्यालयाकडून छाननी करुन अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्यास विलंब होतो. त्या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांना वेळेत अर्ज सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

---

## सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्तीची रक्कम वापराविना पडून असल्याबाबत

**(४) १०५६९ (०९-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) श्री.सुभाष देशमुख (दक्षिण सोलापूर):** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्तीचे ३ कोटी रुपये स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तसेच शिष्यवृत्तीची रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

सहायक आयुक्त, समाजकल्याण, सोलापूर यांनी शिष्यवृत्तीसाठी उघडण्यात आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या खात्यात रुपये ३.२२ कोटी इतकी रक्कम शिल्लक आहे.

(२) शिल्लक असलेल्या रकमेची चौकशी करण्यात येत आहे. चौकशीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हाजीअली ते नरीमन पॉइंट सी लिंक बांधण्याबाबत**

**(५) १०७२० (१०-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दक्षिण मुंबई परिसरामध्ये वाहतुकीचे प्रमाण वाढल्याने वाहतुक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी हाजीअली ते नरीमन पॉईंट असा सी लिंक बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) दक्षिण मुंबई व उपनगरे या मार्गावरील वाढणाऱ्या वाहतुकीच्या सोयीसाठी हाजी अली ते नरिमन पॉईंट असा सागरी सेतू बांधण्याची योजना असून, सदर प्रकल्प (अ) वरळी ते हाजी आणि (ब) हाजी अली ते नरीमन पाँइट या दोन टप्प्यांत करण्याचे नियोजन आहे.

दरम्यान शासनाने वरळी ते हाजी अली या भागात किनारी रस्ता बांधण्याच्या प्रकल्पास अग्रक्रम दिला आहे.

तसेच हाजी अली ते नरीमन पाँइट या भागातील सागरी सेतूसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र मलबार हिल येथे भुयारी मार्ग व नेपियन सी रोड येथे किनारी रस्त्याच्या आखणीस शासनाने प्राथमिकता दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.म्हसास (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील दलित वस्ती गटारीचे बांधकाम निकृष्ट पध्दतीने होत असल्याबाबत**

**(६) ११३०५ (०६-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.म्हसास (ता.पाचोरा) जि.जळगांव येथील दलित वस्ती गटारीचे बांधकाम निकृष्ट पध्दतीने होत असल्याची तक्रार गावक-यांनी विस्तार अधिकारी यांचेकडे जानेवारी, २०१५ मध्ये

केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाचोरा यांचेकडून चौकशी करण्यात आली असून प्राप्त अहवालानुसार गटारीचे बांधकाम हे चांगल्या प्रतीचे असून काम सद्यःस्थितीत प्रगतीत आहे. सबब, कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील लाभार्थ्यांस भुमीहीन शेतमजुर असल्याचा दाखला देण्याबाबत**

**(७) ११९६९ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील भूमिहीन शेत मजुरांना जमीन रु.३ लाख प्रती एकर दराने विकत घेण्याची अट शासनाने डिसेंबर, २०१३ पासून घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अट घातल्यामुळे पात्र असलेल्या भूमीहीन लाभार्थी जमीन खरेदी करण्यास असमर्थ ठरत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, लाभार्थ्यांस भुमीहीन शेतमजुर असल्याचा दाखला देण्याबाबत तहसिलदारांना कोणतेही निर्देश देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील अटी शिथिल करण्याबाबत शासनाकडे विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) होय.
(५) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत लाभार्थ्यास ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर ओलिताखालील जमीन देण्यात येते. तसेच सदरील जमिनीची किंमत प्रती एकरी रु.३ लाख इतक्या कमाल मर्यादेत असावी असे दिनांक ३१/३/२०१२ च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे. तथापि प्रत्यक्षात जमिनीचे दर जास्त असल्यास जमिनीची खरेदी करुन लाभार्थ्यास देता येत नाही. ही बाब विचारात घेवुन, जमीन खरेदीचे दर रु.३.०० लाख या कमाल मर्यादेत वाढ करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परांडा, भूम, वाशी तालुक्यासाठी (जि.उस्मानाबाद) सीआरएफ फंड देण्याच्या मागणीबाबत**

**(८) १२८०५ (०७-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा, भूम, वाशी (जि.उस्मानाबाद) तालुक्यासाठी सीआरएफ फंड देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) परांडा, भूम, वाशी (जि.उस्मानाबाद) येथील रस्त्यांची कामे सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत केंद्र शासनाकडे प्रस्तावित करण्यात आली असून त्यास अद्याप अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही. सदर रस्त्यांची कामे मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येतील.

---

**कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे विविध लाभांच्या योजनांसाठीचा निधी पडून असल्याबाबत**

**(९) १२८६१ (१०-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय सम्राजाच्या विकासासाठीच कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे विविध लाभांच्या योजनांसाठीचा सुमारे १३ कोटी निधी गेल्या दहा महिन्यापासून पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच यांस जबाबदार असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु.११.६२ कोटी तरतूदी पैकी रु.११.५७ कोटी इतका खर्च झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील कुकुळ घाटाचे बांधकाम करणेबाबत**

**(१०) १३०७७ (०९-०४-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा तालुक्यातून (जि.कोल्हापूर) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) उतरण्यासाठी एकमेव जवळचा कुकुळ घाट हा जवळचा मार्ग असल्याने सदर घाटाचे बांधकाम करणेबाबत कोल्हापूर-रत्नागिरी जिल्ह्यातील व्यापारी व उद्योजकांनी तसेच नागरिकांनी वेळोवेळी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

ता.पन्हाळा (जि.कोल्हापूर) किंवा ता.राजापूर (जि.रत्नागिरी) मध्ये कुकुळ घाटाचे बांधकाम करणेबाबतची मागणी /निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर, (जि.लातूर) तालुक्यातील गावातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (दलित वस्ती सुधार योजना) कार्यक्रम अंतर्गत कामे मंजूर असतानाही प्रलंबित असल्याबाबत**

**(११) १३२६४ (१०-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर, जि.लातूर तालुक्यातील मौजे रेणापूर, गरसूळी, खरीम, तळणी आदी गावातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (दलित वस्ती सुधार योजना) कार्यक्रम अंतर्गत कामे मंजूर असतानाही अद्यापही माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामे तातडीने सुरु करुन पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) होय.

(२) गरसुळी, ता.रेणापुर, जिल्हा लातुर येथील काम पाण्याअभावी अपुर्ण असल्याने ते तात्काळ पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आरग (ता.मिरज, जि.सांगली) येथील बौध्दविहारात सोयी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) १४०८९ (१०-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आरग (ता.मिरज, जि.सांगली) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्ती जतन केलेल्या आहेत तेथे बौध्द विहार वॉल कंपाउंड, पथदिवे, शौचालय युनिट, पर्यटकांसाठी बैठक व्यवस्था आदी कामासाठी मा.लोकप्रतिनिधी मिरज यांनी सामाजिक न्याय विभागाकडे कपात सुचना क्र. ३ मध्ये मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर ठिकाणी निधी उपलब्ध करुन केव्हापर्यंत काम पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :**(१) होय.

(२) सदर बौध्द विहार, वॉल कंपाउंड, पथदिवे, शौचालय युनिट, पर्यटकांसाठी बैठक व्यवस्था इत्यादी कामांबाबतचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांचेकडून तयार करण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कापूस एकाधिकारी योजनेत शेतक-यांना पणन महासंघामार्फतच अग्रीम बोनस देण्याबाबत**

**(१३) १६४४६ (१४-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापूस एकाधिकारी योजनेत शेतक-यांना पणन महासंघामार्फतच अग्रीम बोनस देण्यात येत होते, परंतु कापूस एकाधिकार योजना गुंडाळल्यानंतर अग्रीम बोनस देण्याची योजना त्याच वेळी बद पडली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी कापूस उत्पादक शेतक-यांना अग्रीम बोनस देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :** (१) व (२) सन २००४-०५ पासून कापासासाठी अग्रीम अधिक किंमत/बोनस देण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्‌ववत नाही.

---

## कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्याबाबत

**(१४) १७०४३ (१९-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकार तत्वावरील कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर शासनाने कायदेशीर बंधन घातले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने खासगी तत्वावर कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्यास परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खासगी तत्वावर कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :** (१) राज्यातील बाजार समित्यांचे कामकाज सहकार तत्त्वावर होत नसून महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार होते. त्यामुळे त्या कायद्यातील बंधने त्यांचेवर आहेत.

(२) नाही. तथापि, शासनाने खाजगी बाजार स्थापन करण्यास परवानगी दिलेली आहे.

(३) कृषि उत्पन्न बाजार समित्या व खाजगी बाजार यांच्यामध्ये वाजवी स्पर्धा होऊन शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळावा या उद्देशाने खाजगी बाजाराचे परवाने दिलेले आहेत.

---

## संजय गांधी योजना व इतर विशेष सहाय्य योजना अस्थापनेवरील नायब तहसिलदार, उपलेखापाल, अहवाल कारकुन, लिपीक इत्यादी अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत

**(१५) १७२५७ (०६-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी योजना व इतर विशेष सहाय्य योजना अस्थापनेवरील नायब तहसिलदार, उपलेखापाल, अवल कारकुन, लिपीक, शिपाई या अस्थायी पदांना शासनाने शासन निर्णय क्र. संगायो २०१२/प्र.क्र.५१/विसयो-२, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ अन्वये मुदत वाढ दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात वाशिम जिल्ह्यासाठी नायब तहसिलदार-२, अहवाल कारकुन-३, लिपीक-३ या अस्थायी पदांनाच मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील नायब तहसिलदारांची ३ पदे सेवानिवृत्ती १ पद बदलीमुळे रिक्त झाली होती. परंतु शासनानेच सदर पदे ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त ठेवल्यामुळे व भरली गेली नसल्यामुळे ४ पदे व्यपगत झाली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नायब तहसिलदार, उपलेखापाल, अवल कारकुन, लिपीक ही व्यपगत झालेली पदे पुर्नजिवित करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१९-१०-२०१५)** :(१) होय. उपलेखापाल वगळता इतर पदांना मुदत वाढ दिल्याचे खरे आहे.

(२) होय. वाशिम जिल्ह्यासाठी नायब तहसिलदार-२, अव्वल कारकुन-३, लिपीक-३ त्याचबरोबर शिपाई-६ या अस्थायी पदांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विशेष सहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्याकरिता सुधारीत आकृतीबंध तयार करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव व रिसोड (जि.वाशिम) येथील तहसिल कार्यालयाचे नविन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) १७२६१ (०३-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव व रिसोड (जि.वाशिम) येथील तहसिल कार्यालयाच्या नविन प्रशासकिय इमारत बांधकामास शासनाने २ वर्षापासून मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामे सुरू करण्यासाठी लागणार आवश्यक निधी अद्यापही शासनाने उपलब्ध करून दिला नसल्याने सदर कामे सुरू करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मालेगांव व रिसोड येथील तहसिल कार्यालयाचे नविन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन प्रकरणी रिसोड प्रशासकीय इमारतीच्या कामासाठी आतापर्यंत एकूण रु. ५५.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली असून इमारतीच्या बांधकामाच्या निविदा प्रक्रियेचे काम प्रगतीत आहे.

मालेगाव प्रशासकीय इमारतीच्या कामासाठी आजापर्यंत रु.५०.९३ लक्ष इतकी तरतुद करण्यात आली असून इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साखर उद्योग सुस्थितीत आणण्याबाबत**

**(१७) १८१२३ (१३-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना विश्वासात घेवूनच साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षाचा रोडमॅप करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील साखर उद्योगासमोरील अडचणी सोडवून व राज्यातील साखर कारखाने सुस्थितीत आणण्यासाठी, पुढील दहा वर्षाची वाटचाल ठरविण्यासाठी दिनांक २५ व २६ एप्रिल, २०१५ रोजी पुणे येथे साखर परिषद आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साखर उद्योगाला मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१५) :** (१) व (२) साखर उद्योगाचा पुढील दहा वर्षाचा रोडमॅप तयार करण्याबाबत वसंतदादा साखर संस्था, मांजरी (बू.), पुणे येथे दिनांक २५ व २६ एप्रिल, २०१५ रोजी मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साखर परिषदेमधील चर्चासत्रामध्ये चर्चा झालेली आहे.

(३) केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यातील साखर उद्योगास खालीलप्रमाणे मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे :-

१. राज्य शासनाने सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या हंगामामधील ऊस खरेदी कर माफ केलेला आहे.

२. केंद्र शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ च्या अधिसूचनेनुसार १४ लाख मे. टन कच्च्या साखरेच्या निर्यातीसाठी प्रति मे.टन रु. ४०००/- प्रमाणे अनुदानाचा निर्णय घेतला आहे. तर राज्य शासन रु. १०००/- प्रमाणे निर्यात अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

३. केंद्र शासनाचे सन २०१४-१५ साठी दिनांक २३ जून, २०१५ रु. ६००० कोटीचे पॅकेज जाहीर केलेले असून त्यामधून राज्याला अंदाजे रु. २००० कोटी मिळणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाल्याबाबत**

**(१८) १८१९१ (१३-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व विभागातील रस्ते दुरुस्तीसाठी २२४७ कोटी रुपयाची तरतूद शासनाने अर्थसंकल्पात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीचे वाटप विभागनिहाय कशाप्रकारे करण्यात येणार आहे तसेच या निधीतून कोणकोणती कामे वा योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास उक्त कामाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५) :**(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व पुलाच्या परिरक्षण व दुरुस्तीसाठी सन २०१५-१६ मध्ये रु. १५३२.७० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

(२) सदर निधीचे वाटप वैधानिक विकास महामंडळाच्या सुत्रानुसार विदर्भासाठी २३.०३% मराठवाडयासाठी १८.७५% उर्वरित महाराष्ट्रासाठी ५८.२२% या प्रमाणात करण्यात येते.
यामध्ये रस्त्यांवरील खड्डे भरणे, रस्त्यांचे मजबूतीकरण/डांबरीकरण, पुल/मोऱ्यांची दुरुस्ती, रस्त्यांच्या भौतिक मानकामध्ये सुधारणा करणे इत्यादी कामे करण्यात येतात.

(३) सदर योजनेअंतर्गत उपलब्ध निधीच विचार करुन त्याच्याशी सुसंगत दुरुस्ती व देखभालीचा कार्यक्रम तयार करण्यात येतो. गट-अ मधील कामे कार्यकारी अभियंताच्या स्तरावर, गट-ब व क मधील कामे शासन स्तरावर व गट-ड व ई मधील कामे शासनाच्या सहमतीने मुख्य अभियंता स्तरावरुन मंजूर करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

___________

**येवला (जि.नाशिक) येथे टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत**

**(१९) १८२७३ (१४-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे मोठ्या प्रमाणावर हातमाग व यंत्रमाग असल्यामुळे येथील कापसावर जिनिंग, स्पिनिंग, सायनिंग, पावरलुम प्रोसेसिंग व गारमेंट इत्यादी प्रक्रिया करण्यासाठी तसेच येथील हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी टेक्सटाईल पार्क उभारण्याची स्थनिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) होय.
(२) एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजना (Scheme for Integrated Textile Parks) ही केंद्र पुरस्कृत योजना असूर सदर योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ४०% किंवा रु. ४० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून चार हप्त्यात देण्यात येते. मात्र यासाठी इच्छुकांनी एस.पी.व्ही. तयार करुन केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत प्रस्ताव थेट केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर राज्य शासनामार्फत प्रकल्प किंमतीच्या ९% किंवा रु.९ कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील साईकृपा साखर कारखान्यांने शेतकऱ्यांची फसवणूक करुन ठिंबक सिंचनन योजनेत गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२०) १८८८२ (११-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील साईकृपा साखर कारखान्यांने शेतकऱ्यांची फसवणूक करुन ठिंबक सिंचन योजनेत गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०८-२०१५)** : (१) अहमदनगर जिल्ह्यामध्ये श्रीगोंदा तालुक्यात श्री. साईकृपा शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. चे दोन युनिट देवदैठण व हिरडगांव येथे आहेत. सदर दोन्ही युनिट खाजगी असून सदर कारखान्यांनी शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेसाठी कर्ज दिलेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे येथील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालय सोलापूर येथे सुरु करण्याबाबत

**(२१) १८८८४ (१३-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यासाठी प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे कार्यालय पुणे येथे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन जिल्ह्यापैकी सर्वाधिक साखर कारखाने सोलापूर जिल्ह्यात असल्यामुळे पुणे येथील प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालय सोलापूर येथे सुरु करण्याबाबतची मागणी सोलापूर जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१५)** :(१) होय.

(२) सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या दि.२४.१२.२०१४ च्या सभेमध्ये "पुणे, सातारा व सोलापूर या जिल्ह्यात एकूण ५८ साखर कारखाने असून सोलापूर जिल्ह्यामध्ये त्यातील ३५ साखर कारखाने असल्याने विभागीय कार्यालय सोलापूर येथे घेण्यात यावे" असा ठराव क्रमांक ४५० झालेला आहे.

सदर ठराव जिल्हा परिषद, सोलापूर यांचे २/६/२०१५ चे पत्रान्वये साखर आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

(३) व (४) या मागणीवर कार्यवाही सुरु आहे.

---

**पारगाव सालू मालू (ता.दौंड, जि.पुणे) येथील दौंड व शिरुर तालुक्याला जोडणाऱ्या भिमा नदीवरील पुलाची दुरुस्ती होण्याबाबत**

**(२२) १९२५५ (०३-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील पारगाव सालू मालू येथील दौंड व शिरुर तालुक्याला जोडणाऱ्या भिमा नदीवरील पुलाची दयनीय अवस्था होऊन तो पुल पडण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर-सातारा महामार्गावरील दौंड व शिरुर तालुक्याला जोडणा-या भिमानदीवरील या पुलाचे कठडे जीर्ण होऊन त्यावरील सिमेंटचा लेप जावून सळया उघडया पडून काही ठिकाणी कठडे तुटलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलावरुन वाहनांना प्रवास करताना हा पूल हालत असताना प्रवाशांना जीव मूठीत धरुन प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या पुलाची दुरुस्ती होणेबाबत अथवा नव्याने पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) सदर पुलाच्या स्लॅबच्या पुर्नबांधणीच्या कामास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली असून कामाची निविदा प्क्रिया पूर्ण करुन ऑक्टोबर २०१५ पर्यत काम सुरु करुन त्यापुढील ६ महिन्यात संपूर्ण काम करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील निराधार योजनच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(२३) १९२७२ (३०-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळा योजनांच्या माध्यमातून राज्यातील निराधार व्यक्तींनी दरमहा सहाशे ते नवशे रुपये अनुदान दिले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वाढती महागाई व किमान वेतन कायदयाप्रमाणे मिळणारे वेतन पाहता संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेचे अनुदान वाढविण्याची मागणी नागरिकांकडून हात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास या योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय व मा.सामजिक न्याय मंत्री महोदय यांनी दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी आश्वासन दिले होते हे खरे आहे काय,

(४) असल्यास संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेचे लाभार्थ्यांचे मानधन प्रतिमहा ५००० रुपये करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

सदर योजनाअंतर्गत प्रतिलाभार्थी प्रतिमाह रु.६००/- व एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास रु.९००/- प्रतिमाह एवढे अनुदान देण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या योजनांमधील निवृत्तीवेतनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारे चारही घाटरस्त्यातील कामांसाठी निधीच नसल्याने दुरुस्तीची कामे रखडली असल्याबाबत

**(२४) १९५०२ (३१-०७-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारे जिल्ह्यातील महत्वपूर्ण चारही घाटरस्त्यातील जीवघेण्या दरडी रोखण्यासह अत्यावश्यक कामांसाठी निधीच नसल्याने दुरुस्तीची कामे रखडली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या दोन वर्षात उपाययोजनांची कामे न झाल्याने जिल्ह्यातील करुळ, भुईबावड, फोंडाघाट व आंबोली या चारही घाटरस्त्यांवरील पावसाळी वाहतूक धोकादायक होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दररोज सुमारे ६७ हजार ८०० टन वाहतूक होत असतांनाही सध्या त्या घाटरस्त्यांची स्थिती बिकट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय त्यात काय आढळून आले, उक्त घाटरस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, सदर घाटरस्त्यांच्या दुरुस्ती केव्हापर्यंत सुरु होण्याचे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :**(१),(२) व (३) नाही.

(४) सिंधुदुर्ग व पश्चिम महाराष्ट्राचा जोडणारे फोंडाघाट, गगनबावडा, भुईबावडा घाट, करुळ घाट व आंबोली घाट हे ४ घाटरस्ते येतात. दरवर्षी कोकणात प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो. तसेच उंच डोंगर व एका बाजूस खोल दरी यामुळे १) घाट भागामध्ये दरडी कोसळणे २) वाहतुक सुरक्षा कठडे ढासळणे ३) गटारे तुंबणे ४)डांबरीपृष्ठभागावर खड्डे पडणे ५) रस्ता वाहून जाणे यासारख्या समस्यापुढे वाहतुक खंडीत होते. तथापि, यावर उपाययोजना म्हणून घाटामध्ये गॅबीयन वॉल, आर.सी.सी.संरक्षक भिंत, रॉक फॉल बेअरींग, स्पायडर वेब जाळी लावणे, सुरक्षिततेचे बोर्ड, थर्मोप्लास्टीक पेंटचे पांढरे प ट्टे, गटारे साफ करणे, दरडी उपसणे,

झाडी व गवत कापणे, मोऱ्यांची दुरुस्ती करणे, रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली असून सदर चारही घाटांची वाहतुक सुरळीत सुरु आहे. पूरहानी दुरुस्ती/विशेष दुरुस्ती/किरकोळ दुरुस्ती या योजनेंतर्गत शासनाकडून वेळोवेळी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु.पो.जरंडी (ता.तासगाव, जि.सांगली) येथील तालीखालील पांदण रस्त्यावर संरक्षण भिंत व आर.सी.सी. पक्या स्वरुपाचा अवजड वाहतूक पूल बांधण्याबाबत**

**(२५) १९६३५ (३१-०७-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.जरंडी (ता.तासगाव, जि.सांगली) गट नं.७९०, ७९१ येथील तालीखालील पांदण रस्त्यावर संरक्षण भिंत व आर.सी.सी. पक्क्या स्वरुपाचा अवजड वाहतूक होणारा पूल होणेबाबत दिनांक ०८ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) मु.पो.जरंडी (ता.तासगाव, जि.सांगली) येथे गट क्र. ७९०,७९१ हे जरंडी डोंगरसोनी इजिमा क्र. १०४ च्या दोन्ही बाजूस जरंडी गावच्या हद दीत असून या ठिकाणी रस्ता व मोरी बांधकाम सुस्थितीत आहे. या ठिकाणी तालीखालील पाणंद रस्ता अस्तित्वात नाही. सदर रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक व्यवस्थितरित्या सुरु आहे. मागणीकृत पाणंद रस्त्यावर भिंत व आर.सी.सी. पक्क्या स्वरुपाच्या अवजड वाहतूक होणा-या पूलाची सद्य:स्थितीत आवश्यकता नसल्याचे आढळून येत आहे.

---

**विदर्भातील १९ जिल्ह्यांत सुमारे १३ हजार कि.मी रस्त्यांचा अनुशेष बाकी असल्याबाबत**

**(२६) १९७८३ (३०-०७-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अन्य विभागाच्या तुलनेत विदर्भातील १९ जिल्ह्यांत सुमारे १३ हजार कि.मी रस्त्यांचा अनुशेष बाकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भाचा रस्ते विकास करण्यासाठी जिल्हावार आराखडयात जास्त लांबीच्या रस्त्यांचा समावेश करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५)** :(१) व (२) नाही.
राज्यातील अनुशेषासंदर्भात सन १९८४ मध्ये दांडेकर समितीचे गठन करण्यात आले होते व १९९५ मध्ये निर्देशांक समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीने घोषित केलेल्या राज्यक्षेत्रांतर्गत विदर्भासह सर्व प्रादेशिक विभागांचा रस्त्यांचा अनुशेष संपुष्टात आला आहे.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना दिनांक १.५.२०१२ पासून अंमलात आली असून सन १९८१-२००१ रस्ते विकास योजनेच्या तुलनेत १२१६२.८४ कि.मी. नवीन रस्ते लांबी अंतर्भूत करण्यात आली आहे.
(३) व (४) निधीच्या उपलब्धतेनुसार सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना आराखड्यातील उद्दिष्टे साध्य करण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबईत बंदराजवळ स्वतंत्र शेतीमाल निर्यात केंद्र सुरु करण्याबाबत**

**(२७) २१३७३ (१९-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाजीपाल्याचा निर्यातीचा वेग वाढविण्यासाठी मुंबईत बंदराजवळ स्वतंत्र शेतीमाल निर्यात केंद्र सुरु करण्याची मागणी भाजीपाला उत्पादक शेतकरी, निर्यातदार व आयातदार यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर शासनाने आतापर्यंत कोणता निर्णय घेतलेला आहे,
(३) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्वतंत्र शेतीमाल निर्यात केंद्र सुरु करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१५)** :(१) अशा प्रकारे लेखी मागणी आलेली नाही. तथापि, निर्यात सुविधा स्थपित करण्यासंबंधात शासनाने घेतलेले पुढाकार निर्यातदारांसमोर मांडण्यासाठी शासनस्तरावर दिनांक १ ऑक्टोंबर, २०१४ रोजी आयोजित बैठकीत ही गरज निर्यातदारांनी मांडली होती. सदर बैठकीत कृषि व अन्न प्रक्रिया उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) सल्ल्याने निर्यातदारांच्या संघटनेला प्रस्ताव शासनास सादर करण्यास सुचविले होते, तो अद्याप प्राप्त झालेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिशवी ते खोतवाडी (ता.शाहूवाडी) या रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत**
**(२८) २१८१७ (३०-०७-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिशवी ते खोतवाडी (ता.शाहूवाडी) या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभागाने पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असून रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या खडीचे व डांबराचे प्रमाण अत्यंत कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाच्या गुणवत्तेची तपासणी शासनाने त्रयस्त  यंत्रणेकडून केली आहे काय, असल्यास, चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशी पूर्ण होईपर्यंत ठेकेदाराची उर्वरित बिले रोखून ठेवणार आहे काय,
(५) अद्याप पर्यंत चौकशी करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
प्रश्नाधीन पिशवी ते खोतवाडी रस्ता हा प्रजिमा क्र. ८ चा भाग असून त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी आहे. सदर लांबीपैकी ०.६०० कि.मी लांबीत दुरुस्तीची कामे करण्यात आली असून उर्वरीत लांबीतील रस्ता सुस्थितीत आहे. सदर काम सुरु असताना घेतलेल्या साहित्याच्या गुणवत्त्तेचे चाचणी निष्कर्ष समाधानकारक असल्याचे तसेच पूर्ण झालेले काम विहीत मानकानुसार केले असल्याचे व रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत असल्याचे निष्कर्ष दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने त्यांच्या चौकशी अहवालात नोंदविले आहेत
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा गडावर पर्यायी मार्गाच्या रस्त्याबाबत**

**(२९) २१८५९ (३१-०७-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथून पन्हाळा गडावर जाण्यासाठी एकच रस्ता असल्यामुळे बुधवार पेठेतून रेडे घाटीमार्गे पन्हाळा किंवा पुसाटीमार्गे आपरी नावली पन्हाळा या पर्यायी रस्त्याची पाहणी व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू पर्यायी रस्त्याचे काम अद्यापही सुरु न झाल्याची तक्रार पन्हाळा नगरपालिकेच्या पदाधिका-यांनी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पन्हाळा गडावर जाण्यासाठी पर्याची रस्त्याचे काम सुरु होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
पन्हाळगडावर जाणेसाठी पन्हाळा वाघबीळ बोरपाडळे रस्ता मार्ग क्र. १९१ असा असून कोल्हापूर रत्नागिरी रस्ता महामार्ग क्र. १६६ वरील वाघबीळ फाट्यापासून पन्हाळा असा पन्हाळा गडावर जाण्यासाठी एकमेव मार्ग आहे. या रस्त्यावरील बुधवार पेठ या गावापासून पन्हाळ गडापर्यतच्या लांबीत डावे  बाजूस उंच कडा असून सदर लांबीमध्ये दरडी कोसळतात

वाहतुकीची गैरसोय होते. याकरीता पन्हाळा गडावर ये-जा करणेकरीता पर्यायी रस्त्याची पाहणी करुन बुधवार पेठेतून रेडे घाटीमार्गे रस्त्याचे सर्व्हेक्षण करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) होय.

(३) व (४) सद्य:स्थितीत बुधवारपेठ रेडेघाटी तीन दरवाजा रस्ता पर्यायी मार्गाचे सर्व्हेक्षण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि वन विभागाने सर्व्हेक्षण करणेकरीता काही अटींवर परवानगी दिली आहे. सदर अटींमध्ये भारतीय वन अधिनियम १९२७ व वन (संवर्धन) अधिनिमय १९८० चा भंग न करणे विषयी कळविले आहे. सदर लांबीत चढ असलेने व दाट झाडी असलेने सर्व्हेक्षण करणेकरीता वरील अटींची अडचण येत आहे. तसेच भारतीय पुरातत्व खात्याची परवानगी घेणे सुध्दा अनिवार्य आहे. सदर सर्व्हेक्षणानंतर रस्त्याचे आखणीनुसार अंदाजपत्रक करणे व पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग यवतमाळ अंतर्गत सुरु असलेल्या करंजी-वणी-घुग्घुस-चंद्रपूर या मार्गातील चंद्रपूर येथील घुग्घुस - पडोली या मार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(३०) २२१७७ (३१-०७-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग यवतमाळ अंतर्गत सुरु असलेल्या करंजी-वणी-घुग्घुस-चंद्रपूर या मार्गातील चंद्रपूर येथील घुग्घुस-पडोली या मार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरु असून सदर मार्गातील खुटाळा आणि चिंचाळा येथील सर्व्हे नं.३२,३३,३४ आणि ८/१ (अनुक्रमे) या शेत जमिनीतून रस्त्याचे बांधकाम सुरु असून सदर शेतमालकांना कुठल्याही प्रकारचा व कोणताही मोबदला न देता कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग पांढरकवडा, जि.यवतमाळ यांनी रस्त्याचे बांधकाम सुरू केल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शेतकऱ्यांची परवानगी न घेता किंवा रितसर कोणताही मोबदला न देता उक्त सर्व्हे नंबरच्या शेतीत रस्ता बांधकाम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर मार्गामुळे बाधीत उक्त सर्व्हे नंबरच्या शेतक-ऱ्यांना कोणता मोबदला देण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृषि उत्पन्न बाजार समिती तिरोडा (जि.गोंदिया) येथे गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) २२३६६ (१९-०८-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि उत्पन्न बाजार समिती तिरोडा (जि.गोंदिया) येथे मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाने निदर्शनास आणून दिले असून शासनाने संबंधित अधिका-याची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले ,

(३) तसेच दोषी संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) होय.

(२) याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून बाजार समितीच्या बांधकामाबाबत अनियमितता व संचालक मंडळाने गैरव्यवहार केल्याचे आढळून आले.

(३) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ४५(१) नुसार सदर बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखाने अवसायनात निघाल्याबाबत**

**(३२) २२३९९ (१३-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखाने अवसायनात निघाल्याचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखाने अवसायनात निघाल्याने कारखान्याचे कामगार खाजगी सावकारांच्या विळख्यात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी सावकारांचा जाच सहन करावा लागत असल्यामुळे अनेक कामगारांना आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे,

(४) असल्यास, कारखाने बंद पडल्याने त्यावर अवलंबून असलेले व्यवसायही बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कामगारांना मदत करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) व (२) अहमदनगर जिल्ह्यातील ३ सहकारी साखर कारखाने दिनांक २१ मे,२०१५ पूर्वी अवसायनात घेण्यात आलेले आहेत. तथापि त्यामुळे कारखान्याचे कामगार खाजगी सावकारांच्या विळख्यात सापडले असल्याचे निदर्शनास येत नाही.

(३) नाही.
(४) नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि, वाळकी, ता.नगर व जगदंबा सहकारी साखर कारखाना लि, राशिन, ता.कर्जत, जि. अहमदनगर या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील व्यवसाय चालू आहेत. तथापि पारनेर तालुका सहकारी साखर कारखाना लि., देवीभोयरे, ता.पारनेर, जि.अहमदनगर या कारखान्यांवर अवलंबून असणारे व्यवसाय बंद आहेत. तथापि याबाबत व्यावसायिकांनी अवसायक अथवा साखर आयुक्त, पुणे यांचेकडे तक्रार केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तेरणा शे.स.साखर कारखाना, तेरणानगर, ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) च्या लेखापरीक्षणामध्ये गंभीर बाबी आढळून आल्याबाबत**

**(३३) २२४१० (१४-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेरणा शे.स.साखर कारखाना, तेरणानगर, ढोकी (ता.जि.उस्मानाबाद) च्या लेखापरीक्षणामध्ये गंभीर बाबी आढळून आल्यामुळे शेतकऱ्याने दाखल केलेल्या उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथील याचिकेवरील उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने चौकशीसाठी निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत या समितीने काय चौकशी केली आहे व अहवाल केव्हापर्यंत येणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१५) :**(१) होय.
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक ४ मार्च, २०१५ च्या आदेशानुसार निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली असून नियुक्तीच्या दिनांकापासून पुढे आठ महिन्याच्या कालावधीच्या आत चौकशी अहवाल येणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक (पूर्व) या विभागाअंतर्गत असलेल्या चांदवड-मनमाड-नांदगांव या राज्यमार्गाचे कामास सुरुवात करण्याबाबत**

**(३४) २३१४७ (०३-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक (पूर्व) या विभागाअंतर्गत असलेल्या राज्य मार्ग क्रमांक २४ चांदवड-मनमाड-नांदगांव या राज्य मार्गाचे कामास बी.ओ.टी.

तत्वावर मंजूरी देण्यात आलेली असून या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या कामास सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) १.मनमाड व नांदगाव बाह्यवळण रस्त्याकरीता भुसंपादनाची प्रक्रिया प्रगतीत आहे.
२. प्रकल्पासाठीची संपुर्ण जागा खात्याच्या ताब्यात आल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपुर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी आणि सिंदेवाही येथील तहसिल कार्यालयांची नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकामाच्या निधीबाबत

**(३५) २३४०८ (१३-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपुर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी आणि सिंदेवाही येथील तहसिल कार्यालयांची नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी कार्यकारी अभियंता, रोहयो सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी १३ कोटी ८५ लक्ष रुपये आणि १३ कोटी २५ लक्ष रुपये अंदाजपत्रक असलेल्या रितसर कागदपत्रासह प्रस्ताव अंतिम मंजूरीकरीता मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले असता या प्रस्तावास बांधकाम समितीने माहे मार्च, २०१५ च्या सुमारास मंजुरी दिले असल्याची माहिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपरी आणि सिंदेवाही येथील तहसिल मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसह प्रस्तावास मंजुरी देवुन प्रशासकीय मान्यता देण्यात यावी याकरीता लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ७ जानेवारी, २०१५ आणि २ जुन, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री, बांधकाम मंत्री, अप्पर मुख्य सचिव बांधकाम विभाग यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब्रम्हपुरी आणि सिंदेवाही येथील तहसिल कार्यालयाची नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसह प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्नाधीन कामास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील बांधकाम समितीची मंजूरी प्राप्त

होताच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खटाव (जि. सातारा) या तालुक्यातील औंध भागातील अनेक पुल अतिशय धोकादायक असल्याबाबत**

**(३६) २३४१८ (०३-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) या तालुक्यातील औंध भागातील अनेक पुल हे ब्रिटीशकालीन असल्यामुळे या पुलांचे ठिकठिकाणी कठडे तुटले असून ते अतिशय धोकादायक झाले असल्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मोडकळीस आलेल्या पुलांची त्वरीत दुरूस्ती व नव्याने पुलांची बांधणी करण्याकरिता तसेच पुलाच्या बांधणी करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागावर व ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) नाही.
तथापि काही पुलांची व मोऱ्यांची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. पूलावरुन वाहतूक सुरक्षितपणे चालू आहे. काही पुलांचे रुंदीकरण करण्याची आवश्यकता आहे.सदर कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेवून पूर्ण करण्याचे प्रयन राहतील.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बारामती येथील श्री.सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यास सन २००९-१० ते २०१३ -१४ या कालावधीत १२६ कोटी ७३ लाख ३६ हजार ५९७ रुपयांचा झालेला तोटा**

**(३७) २३९३० (२१-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) येथील श्री.सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यास सन २००९-१० ते २०१३ -१४ या कालावधीत १२६ कोटी ७३ लाख ३६ हजार ५९७ रुपयांचा तोटा झाल्याचे निष्कर्ष चाचणी लेखापरीक्षण अहवालात काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी मा.साखर आयुक्त यांनी सहकार कायदयाच्या कलम ८८ नुसार संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिनांक २ मे, २०१५ रोजी वा

त्यासुमारास निर्गमित केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व प्रश्न भाग २ च्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असलयास, चौकशीत काय आढळून आले व पुढे संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१५) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी करणेसाठी श्री.डी.आर. घोडे, सेवा निवृत्त अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून साखर आयुक्तांकडून नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्याबाबत

**(३८) २४०५१ (३०-०७-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेचे कामकाज निधी उपलब्ध नसल्यामुळे बंद झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जातीच्या दारिद्रयरेषेखालील शिल्लक राहिलेल्या लाभार्थ्यांना इंदिरा आवास योजनेमधून लाभ देण्यात येणार आहे. रमाई आवास योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्राकरीता उद्दिष्ट निरंक असल्यामुळे निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील पणन संचालक कार्यालय मुंबईत स्थलांतरित होत असल्याबाबत**

**(३९) २४११४ (१४-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि पणन प्रक्रिया संस्थांचे मुख्यालय असलेले पुण्यातील पणन संचालक कार्यालय मुंबईत स्थलांतरीत होत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षानुवर्षे मुंबईत असलेल्या सहकार खात्यातील दोन अधिकाऱ्यांची पुण्यात येण्याची इच्छा नसल्याने त्यांच्या सोयीसाठी पणन संचालक कार्यालय मुंबईला नेण्याच्या हालचाली सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाजकल्याण विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाकरीता शिष्यवृत्ती महाविद्यालयाला मिळत नसल्याबाबत**

**(४०) २४१४९ (०६-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाकरीता सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्ती जोंधळे व शहापूर तालुक्यातील इतर महाविद्यालयांना पोहचली नसल्याने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक शुल्क भरण्याचा तगादा लावला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांने शैक्षणिक शुल्क न भरल्यामुळे महाविद्यालयाने प्रवेशाच्यावेळी निकाल राखून ठेवल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्याची कारणे काय आहेत,तसेच उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५) :** (१) नाही.

सन २०१४-१५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील माहिती व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत वितरीत करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेबडओहोळ (ता.मावळ, जि.पुणे) येथील पुलाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(४१) २४२४८ ३१-०७-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील जिल्हा पुणे येथील औद्योगिक क्षेत्रासह पवन मावळातील पंचवीस गावांना जोडणा-या पवना नदीवरील बेबडओहोळ पुलाचे काम गेल्या चार वर्षापासून धीम्या गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या स्लॅबचे काम अंतिम टप्पात आले असून, पश्चिमेकडील बाजुचा स्लॅब, तर पूलांच्या दोन्ही बाजुंकडील भरावाचे व रस्त्याचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांना जीव मुठीत घेऊन जून्या पुलावरील पाण्यातूनच प्रवास करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या वर्षी पुलाचे काम लवकरात लवकर पुर्ण होऊन परिसरातील नागरीकांची दळणवळण सेवा पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर संबंधित अधिका-यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) व (२) होय
पुलाची उंची जास्त असल्यामुळे, पुलाच्या पायाचे डिझाईन (Well Fundation) मध्ये बदल झाल्यामुळे तसेच पुलाच्या जोडरस्त्याचे काम हे भूसंपादन न झाल्यामुळे धिम्या गतीने सुरु होत
सद्य:स्थितीत पुलाच्या ६ पिलरचे व ६ गाळयांचे काम पूर्ण झालेल असून पश्चिचमेकडील बाजूचे १ स्पॅनच्या स्लॅबचे व १ अॅबटमेंटचे काम बाकी आहे
जोडरस्त्यासाठी भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात असून भूसंपादन पूर्ण होताच काम तातडीने हाती घेण्यात येत आहे.
(३) अंश:त खरे आहे
नागरिकांना सद्य:स्थितीत जुन्या पुल कम बांधऱ्यावरुन प्रवास करावा लगत आहे. सदर पुलावरुन वाहतूक सुस्थितीत चालू आहे. मोठया प्रमाणावर पाऊस झाल्यावरच पूल पाण्याखाली जातो व त्यावेळेस वाहतूक बंद असते. पर्यायी रस्त्याने वाहतूक चालू असते
(४) होय.
सदर काम २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले असून पुलाचे काम निधी उपलब्धता व निकषांप्रमाणे करण्यत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कापूस खरेदी केंद्र बंद केल्याबाबत**

**(४२) २४३७६ (१९-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) व पणन महासंघाचे जामनेर, भुसावळ वगळता सर्व कापूस खरेदी केंद्र माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कापूस खरेदी केंद्र एवढया लवकर बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यामुळे शेतक-यांना आपला कापूस खाजगी व्यापा-यांना अत्यल्प किंमतीला विकावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) फेब्रुवारीच्या शेवटी व मार्चच्या पंधरावड्यात हमी भावापेक्षा कापसाचे बाजारभाव वाढल्याने शेतकऱ्यांनी कापूस पणन महासंघाकडे कापसाची विक्री न करता त्यांच्याकडील कापसाची खाजगी व्यापाऱ्यांकडे विक्री केली. त्यामुळे बऱ्याच कालावधीपर्यंत कापुस उत्पादक पणन महासंघाकडे कापसाची आवक नसल्यामुळे कापूस खरेदी केंद्र दि.१३.३.२०१५ पासून बंद करण्यात आली.

(४) जळगांव विभागात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाने १२ व सीसीआयने १३ कापूस खरेदी केंद्र कार्यान्वित केली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकरीता द्रारिद्रय रेषेखालील अट रद्द करण्याबाबत**

**(४३) २४४४७ (३०-०७-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकरीता द्रारिद्रय रेषेखालील अट रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, नाशिक यांनी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-१०-२०१५)** :(१) होय.

(२) सदर बाब धोरणात्मक असून त्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलगंगा (ता.चाळीसगांव,जि.जळगांव) हा सहकारी साखर कारखाना सुरु करण्याबाबत**

**(४४) २५२९६ (१९-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलगंगा (ता.चाळीसगांव,जि.जळगांव) हा सहकारी साखर कारखाना हा सन २००७-०८ पासून बंद असल्याने ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार/नोकरदार वर्ग यांचे प्रचंड हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेलगंगा सहकारी सा.कारखाना सुरु करण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :** (१) व (२) बेलगंगा (ता.चाळीसगांव, जि. जळगांव) हा सहकारी साखर कारखाना सन २००९-१० पासून बंद आहे. सदरचा कारखाना सुरु करणेबाबत मा. मंत्री (सहकार) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.
(अ) सदर कारखाना सुरु करण्याबाबत आराखडा तयार करण्यासाठी साखर आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात यावी. समितीमध्ये अध्यक्ष जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जळगाव व अवसायक बेलगंगा सहकारी साखर कारखाना यांचा समोवश असावा.
(ब) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बेलगंगा सहकारी साखर कारखान्यास OTS योजना लागू करणेबाबत निर्णय घ्यावा.
(क) समितीने बेलगंगा सहकारी साखर कारखाना मर्या.भोरस ता.चाळीसगाव, जि.जळगाव कारखाना सुरु होण्याच्या दृष्टीकोनातून दीर्घमुदतीवर, भाडेतत्वावर देणेबाबतचा आराखडा तयार करावा. सदर आराखड्यानुसार शासनाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी.

यासंदर्भात साखर आयुक्त, पुणे कार्यालयाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये कारखान्याचे अवसायक व कार्यकारी संचालक, दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जळगाव यांना सूचना दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवधाबा-मलकापूर-पान्हेरा-बडोदा-हिंगणेगव्हाळ (जि.बुलढाणा) या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाबाबत**

**(४५) २५४२१ (३१-०७-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे देवधाबा-मलकापूर-पान्हेरा-बडोदा-हिंगणेगव्हाळ हा प्रमुख जिल्हा मार्ग ६/० ते १०/० व १८/० ते २६/० असा एकूण

अनुक्रमे ४ किमी व ८ किमी असा दोन टप्प्यातील १२ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना ये-जा करणे त्रासाचे झाले असल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ३८० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

(४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

### गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४६) २५५३३ (३०-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) हिरण्यकेशी नदीला येणा-या पुरामुळे कवळीकट्टी, तेरणी, हलकर्णी, अदरगुच्ची, कडलगे, अरळगुंडी, नागनूर, येथील रस्ते पुराच्या पाण्यामुळे खचले आहेत, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी चंदगड यांनी रस्त्यांची दुरुस्ती करण्याबबतचे निवेदन दिनांक १५ जून, २०१५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१५) :** (१) होय.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेप्रमाणे सदर रस्ता गडहिंग्लज तालुक्यातील नांगनूर येथील हिरण्यकेशी नदी काठावरील प्रजिमा ५९ चा भाग आहे. सदर भागामध्ये हिरणकेशी नदी ही रस्त्याच्या बाजूने वाहते नदीच्या प्रवाहामुळे रस्ताच्या भरावयाची हानी होते.

(२) होय.

(३) सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती

घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगाव) येथील एम.आय.डी.सी.मध्ये जमिनीवर टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत**

**(४७) २६०७९ (२१-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) येथील एम.आय.डी.सी. मध्ये १०० एकर जमिनीवर टेक्सटाईल पार्क उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील टेक्सटाईल पार्कमध्ये स्थानिक उद्योजकांना प्राधान्य देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :**(१) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२१.०५.२०१५ रोजी नांदगावपेठ, अमरावती या मेगा टेक्सटाईल पार्कच्या धर्तीवर राज्यातील कापूस उत्पादन क्षेत्रात जळगावसह आठ ठिकाणी एम.आय.डी.सी. मार्फत मेगा टेक्सटाईल पार्क उभारणी करण्याची घोषणा केली आहे.
(२) स्थानिक उद्योजकांना प्रचलित नियमानुसार सुविधा उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षता व गुण नियंत्रण प्रादेशिक विभाग, पुणे येथील उप अभियंता यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत**

**(४८) २६१३७ (०७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षता व गुण नियंत्रण प्रादेशिक विभाग, पुणे येथील श्री.डी.एम.फडतारे, उप अभियंता यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहारा यांनी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे सुचीत केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत

आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१०-२०१५)** :(१) होय.
(२)श्री.डी.व्ही.फडतरे, उप अभियंता यांची दि. ३०.५.२०१५ च्या शासन आदेशान्वये दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे येथून सा.बां. प्रकल्प (खाजगीकरण) उप विभाग, पुणे येथे बदली करण्यात आली आहे. तसेच उक्त निवेदनातील मुद्यांचे अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कडून चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरगा (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी अर्थसकल्प २०१५-१६ मध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(४९) २६१५० (०७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी अर्थसकल्प २०१५-१६ मध्ये समाविष्ट करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वार विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-१०-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन प्रकरणी प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर काम प्रशासकीय मान्यतेनंतर निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील साखर उद्योगाला २००० कोटीचे बिनव्याजी कर्ज देण्याबाबत**

**(५०) २६१७९ (१४-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साखर उद्योगाला २००० कोटीचे बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय शासनाने माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१५) :**(१) व (२) साखर कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या एफआरपीची प्रलंबित रक्कम देता यावी म्हणून केंद्र शासनाने दिनांक २३ जून, २०१५ च्या अधिसूचनेनुसार सॉफ्ट लोन योजना जाहिर केली आहे. त्यानुसार राज्यातील पात्र साखर कारखान्यांना अंदाजे रु. २००० कोटी रुपये कर्ज रक्कम देय होते. यानुषंगाने केंद्र शासनाच्या निकषात बसणाऱ्या कारखान्यांबाबतचा शासन निर्णय दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी निर्गमित केला आहे. तसेच दोन्ही वर्षाचे गाळप हंगाम न घेतल्याने या सॉफ्ट लोन योजनेच्या निकषात न बसणाऱ्या २२ साखर कारखान्यांना व्याज अनुदानाचा लाभ राज्य शासनाच्या निधीतून देण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ अन्वये घेतला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.